श्री. तुळशीराम चिमा धोत्रे, परिचर, प. वै. द.
पिंपळगाव लांडगा, ता. अहिल्यानगर यांना
ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजुर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग-१

जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-४/३४/225/२०२६

अहिल्यानगर दिनांक- स्वाक्षरीत नमूद केल्याप्रमाणे

वाचा:- १. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा. क्र. वशि/आस्था-१/२१९/२०२६ दि. ११/०२/२०२६

२. कार्यालयीन पत्र जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/३४/८९/२०२६ दि. २५/०२/२०२६

३. गट विकास अधिकारी, पं. स. अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा. क्र. वशि/आस्था-१/२८७/२०२६ दि. ०६/०३/२०२६

४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील अधिकार प्रदान आदेश जा. क्र. साप्रवि-१/र.व.का./६९६/२०१६ दि. १७/०६/२०१६

५. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६

श्री. तुळशीराम चिमा धोत्रे, परिचर, प. वै. द. पिंपळगाव लांडगा, ता. अहिल्यानगर यांनी ऐच्छीक सेवानिवृत्ती मिळणेबाबत संदर्भ क्र. १ अन्वये प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. श्री. तुळशीराम चिमा धोत्रे हे परिचर या पदावर प्रा. आ. केंद्र आंबवणे, ता. मुळशी, जि. पुणे येथे दि. २७/०३/२००६ रोजी रुजू झाले होते व आंतर जिल्हा बदलीने पंचायत समिती अहिल्यानगर येथे दि. २६/०८/२००९ रोजी हजर झाले असून ते प. वै. द. पिंपळगाव लांडगा, ता. अहिल्यानगर येथे कार्यरत आहेत. त्यांची एकूण २० वर्ष १ महिना ९ दिवस सलग सेवा झालेली आहे.

संदर्भ क्र. ३ नुसार श्री. धोत्रे, परिचर यांचेकडे कोणत्याही प्रकराची शासकीय/जि. प. ची येणे बाकी नसुन व त्यांचेविरुद्ध कोणतीही प्रकारची विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नसलेचे अहवाल प्राप्त झाला आहे. तसेच जिल्हा परिषद सर्व्हन्टस को. ऑप सोसायटी लि. अहिल्यानगर यांनी श्री. धोत्रे, परिचर यांचेकडे प्रलंबित कर्जाची रक्कम रुपये १,५४,०००/- अक्षरी रुपये एक लाख चोपन्न हजार मात्र येणे बाकी असल्याचे कळविले आहे. सदर वसुलपात्र रक्कम त्यांचे सेवाउपदानातुन तसेच अंशराशीकरणातुन वसुल करणेत यावी. तरी सदरची वसुली करणेच्या अधिन राहुन, नियुक्ती प्राधिकारी हे ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूरीस सक्षम प्राधिकारी आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ नुसार "२० वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण झालेनंतर शासकीय कर्मचारी नियुक्ती प्राधिकाऱ्यास कमीत कमी ३ महिन्यांची लेखी नोटिस देऊन सेवेमधून केव्हाही सेवानिवृत्त होता येईल" असे नमुद आहे. श्री. धोत्रे, परिचर यांनी दि. ३०/०१/२०२६ रोजी ऐच्छीक सेवानिवृत्ती प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ४ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ मधील तरतुदीनुसार, श्री. धोत्रे, परिचर यांना दि. ३०/०४/२०२६ रोजी मध्यानोत्तर ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूर करणेत येत आहे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक 202604200400974 असा आहे.

Digitally signed by
Rahul Ashok Shelke
Date: 20-04-2026
12:09:49

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. तुळशीराम चिमा धोत्रे, परिचर,
प. वै. द. पिंपळगाव लांडगा, ता. अहिल्यानगर
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर

२/- श्री. तुळशीराम चिमा धोत्रे, परिचर, प. वै. द. पिंपळगाव लांडगा, ता. अहिल्यानगर, यांना दि. ३०/०४/२०२६ रोजी मध्यानोत्तर कार्यमुक्त करावे, आणि पेन्शन प्रकरणाबाबत आवश्यक ते सर्व दाखले समाविष्ट करुन सत्वर सादर करणेची दक्षता घ्यावी. श्री. धोत्रे, परिचर यांचे अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को. ऑप सोसायटी लि. अहिल्यानगर यांचेकडील प्रलंबित कर्जाची रुपये १,५४,०००/- अक्षरी रुपये एक लाख चोपन्न हजार मात्र कर्ज प्रलंबित असुन सदर कर्जाची रक्कम श्री. धोत्रे, परिचर यांना देय असलेल्या उपदान व अंशराशिकरणातुन वसुल करावी. तसेच सेवानिवृत्ती नंतर भविष्यात शासकीय/जिल्हा परिषदेकडील वसुली पात्र रक्कम निघाल्यास ती त्यांचे सेवानिवृत्तीपासुन मिळणा-या रक्कमेतून वसुलीस ते पात्र राहतील.

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत- साप्रवि-१/पेन्शन, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत- निवड नस्ती